पत्र

जा.क्र. मृदसं/मृद-४/शेततळे/अनुदान वितरण-कार्यपध्दती/७४६ /२०१६
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे-१ दि. ३१/०३/२०१६

प्रति,

**विभागीय कृषि सह संचालक**

**------------ सर्व**

**विषय — पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत घेण्यात येणा-या शेततळ्यांचे अनुदान वितरण कार्यपध्दती बाबत.**

**संदर्भ —** १) शासन निर्णयक्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५,मंत्रालय,मुंबई-३२,दि.१७/२/२०१६
२) आयुक्तालयाचा पत्र जा.क्र.मृदसं/शेततळे/मासु/मृद-४/४१७/२०१६ दि.२२/०२/२०१६
३) शासन पत्र जलसं-२०१६/प्र.क्र.४८/जल-७ दि. ११ मार्च २०१६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये "मागेल त्याला शेततळे" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यास संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयान्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार शेततळ्याचे कामासाठी सविस्तर मार्गदर्शक सुचना संदर्भ क्र. २ वरील पत्रान्वये यापूर्वीच आपणास पाठविण्यात आलेले आहे.

पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेखाली शेततळे उपचारास मान्यताप्राप्त आहे. शेततळे या उपचाराच्या कामामध्ये एकवाक्यता राखण्याच्या दृष्ट्रीने सर्व पाणलोट विकास योजनेतील शेततळ्यासाठी एकच कार्यपध्दती अवलंबविण्यास संदर्भ क्र. ३ वरील शासन पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.

शासन मान्यतेनुसार "मागेल त्याला शेततळे" या योजनेचा संदर्भिय शासन निर्णय नियोजन विभाग क्र. शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ मधील परिच्छेद क्र. ४.१ मधील अनु. क्र. १४ ते १८ येथील नमुद कार्यपध्दती व १.३ मधील मापदंड वापरण्यात यावेत.

वरील प्रमाणे शेततळे कामासंदर्भात वापरावयाच्या कार्यप्रणालीचा अवलंब करणे बाबत आपले अधिनस्त कार्यालयांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**
**कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे-१**

**प्रत — जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व---------यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**